

टिकून राहिले. दोहोबाजूंनी निरपेक्षपणे. त्यातले अनेक आपापल्या क्षेत्रात मोठे झाले. पण मैत्रीतला समान धागा लौकिक मोठेपणाचा नव्हे तर निरपेक्ष संबंधांचाच राहिला. चितळे बंधूंपैकी स्व.राजाभाऊ चितळे, जलतज्ज्ञ माधवराव चितळे, ज्ञानप्रबोधिनीचे य.शं.लेले, निवृत्तीनंतर रक्तसंकलनासाठी अक्षरशः रक्त आटविणारे शरद हरी भिडे आणि बी.एम.सी.सी. कॉलेजातली आणखी काही सहाध्यायी. राजाभाऊ चितळ्यांनी सांगितलेली एक आठवण मोठी मजेशीर आहे. ते एकदा मला सांगत होते, आमच्या मैत्रीत दोन समान दुवे आहेत. सायकल शिकत असताना आम्ही दोघेही पहाटे पहाटे सायकलवर टांग टाकून निघायचो. मी दूध घालायला आणि हा पेपर टाकायला. दुसरा दुवा कारकीर्दीचा..माझा दुधाशी असलेला संबंध आणखी दाट झाला अन् राजकारणाच्या निमित्तानं याचं वर्तमानपत्राशी नातं जडलं!

रामभाऊंच्या मनातल्या माणसांच्या ओळखीच्या खुणाही मोठ्या विचित्र आहेत. त्याचं नुकतंच लग्न झालेलं. सपत्नीक रेल्वेनं माथेरानला निघालेले. तेव्हा कर्जत स्टेशनवर एका माणसानं यांना एकेरीत हाक मारली. हे थांबले. क्षेमकुशल विचारणं झालं. त्या माणसानं प्रेमानं पाठीवरनं हात फिरवला अन् निरोप घेतला. माझ्या सासूनं लागलीच रामभाऊंना अप्रूपानं विचारलं की सुधीर फडके म्हणजे बाबूजींना तुम्ही इतकं चांगलं कसे ओळखता? त्यांची तुमची इतकी घट्ट ओळख कशी? त्यावर शांतपणे या माणसानं उत्तर दिलं, ते आमचे संघवाले आहेत! मोहमयी जग खुणावत असतं. अशा काळात तरुणपणी-विद्यार्थीदशेत गदिमा, बाबूजी आणि राजा परांजपे हे महाराष्ट्राला पडलेलं सुंदर तिपेडी स्वप्न जवळून पाहिलेलं. तेही गदिमांच्या आऊट हाऊसमध्ये राहून गदिमा किंवा बाबूजींच्या प्रतिमेविषयी ते सर्वस्वी अनभिज्ञ आहेत अशातला भाग नाही. पण त्यांच्या मनात ओळखीची खूण सांगणाऱ्या प्रतिमाच मुळी वेगळ्या आहेत. अमिताभ त्यांना ठाऊक असतो, तो अलाहाबादचा माजी खासदार म्हणून. ओळखीचा मापदंड लौकिक नव्हे तर थेट अनुभवाशी निगडित आहे. म्हणूनच तर त्यांच्यासाठी गदिमांची खूण-ओळख काय तर वडिलांचे अण्णांचे आटपाडीतले विद्यार्थी. नव्या नट-नट्यांशी तर काही देणंघेणंच नाही. शेखर सुमनचा 'मूव्हर्स ॲण्ड शेकर्स' नावाचा एक कार्यक्रम होता. एकदा रामभाऊ त्याचं रेकॉर्डिंग करून घरी आले. आम्ही विचारलं, दुसरी सेलिब्रिटी कोण होती? ते म्हणाले, एक नटी होती. नाव काय? आमचा पुढचा प्रश्न.

के.के.शहा, हे त्यांचं उत्तर.

कुठलीही नटी असं नाव लावणार नाही याची खात्री असल्यानं कुतुहलापोटी मी फोनाफोनी सुरू केली. मग उलगडा झाला की ती कहकशाँ होती. 'टिपू सुलतान' मालिकेतच्या विपर्यस्त इतिहासावर लोकसभेत आक्षेप घेणाऱ्या रामभाऊंना एकदा विमानात शेजारी बसलेल्या प्रवाशानं विचारलं, तुम्ही माझ्यामागे का लागले आहात, त्यावर त्यांचा प्रतिप्रश्न मी कशाला कुणाच्या मागे लागू, तशात तुम्हाला तर मी ओळखतसुद्धा नाही. त्यावर शेजारच्या माणसाला धक्का बसला, पण खरं सांगताहेत हे जाणवल्यानं त्यानं तो पचवलाही. त्या इसमाचं नाव होतं अभिनेता-निर्माता संजय खान! नाना पाटेकर त्यांच्या लक्षात राहतो तो पक्षाच्या पोस्टर्स डिझाइनमध्ये मदत करणारा आर्ट स्कूलचा विद्यार्थी म्हणून, त्या अर्थानं आर्टिस्ट म्हणून. त्यांना या विषयात पडायचंच नसतं म्हणून ही अनभिज्ञता असते. शंभर टक्के बाय चॉईस!

नाटक-सिनेमाशी रामभाऊंचा जो काही थोडाथोडका संबंध आला त्याचं श्रेय सर्वस्वी अटलबिहारी वाजपेयीच. अटलजी रसिक श्रोता आणि प्रेक्षकही. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था करण्याची जबाबदारी पडलेल्या रामभाऊंनी त्यांच्यासोबत उंबरठा, सिंहासन, पिंजरा, सूरज का सातवाँ घोडा, गहराई यासारखे पिक्चर बघितले. पुरुष, ती फुलराणी, तो मी नव्हेच अशी काही नाटकं पाहिली तीही